# मल्लखांब स्पर्धेत महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थी चमकले



मुंबई : सांताक्रूझमधील सानेगुरुजी आर्य विद्यामंदिर आणि नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (एनएसएसएच) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या शालेय मल्लखांब स्पर्धेत वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थी चमकले. त्यांना प्रशिक्षक विनायक धामणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या शालेय स्पर्धेत मुंबईतील २३ शाळांचे संघ सहभागी झाले होते. १२, १४, १६ वर्षांखालील आणि १६ वर्षांवरील गटात मुलांच्या स्पर्धा झाल्या. मुलींसाठी १२, १४, १८ वर्षांखालील तसेच १८ वर्षांवरील असे गट होते. विविध गटांतील ३५ विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. पारंपरिक मल्लखांबला पुनरुज्जीवन देण्यासह लोकप्रिय करण्यादृष्टीने सानेगुरुजी आर्य विद्यामंदिर आणि एनएसएसएच हा उपक्रम राबवण्यात आला.